
PLAN OF 6651/1 BEFORE AMALGAMATION
PLAN OF 6652(PART) BEFORE AMALGAMATION
PLAN OF 6651/1 + 6652(PART) AFTER AMALGAMATION
6651/1
6651/2
1000.00 SQMT.
6652
3700.00 SQMT.
6654
ROAD
6651/1 & 6652(PART)
NORTH
AREA STATEMENT :
OWNER'S SIGN.
PARATE AND ASSOCIATES

नगर परिषद उमरेड जिल्हा – नागपूर

परिशिष्ट डी – 3

(भुखंड एकत्रीकरण प्रमाणपत्र)

क्रमांक– एमसीयू/16/ब्रांचि-185/2015
कार्यालय नगर परिषद उमरेड
दिनांक – 21/5/2015

प्रति,

मे. मॉ.वैष्णवी रियअल इस्टेट
तर्फे श्री प्रदीप देविदास रिठे
रा.उमरेड

विषय – **भुखंड एकत्रीकरण परवानगीबाबत.**

संदर्भ – 1) आपला अर्ज दिनांक 2/5/2015

आपले उपरोक्त अर्जाचे अनुषंगाने आपणास उमरेड नगर परिषद हद्दीतील जोगीठाणा पेठ येथील नगर भुमापन क्रमांक 6851/1 व 6852(भाग) वरील आपल्या मालकीच्या जागेवर नकाशात लाल शाईने दर्शविल्याप्रमाणे [2691.60 + 653.23] = 3344.83 चौ.मी. क्षेत्रफळाच्या भुखंडाचे एकत्रीकरण करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 45 ला अधिन राहून खालील अटी व शर्ती वर परवानगी देण्यात येत आहे.

1) या कार्यालयाकडुन मंजुरी दिलेल्या नकाशाप्रमाणे एकत्रीकरण करावे लागेल. मंजूरी प्रमाणे एकत्रीकरण न केल्यास परवानगी रद्द करण्यात येईल.

2) मंजुर नकाशा प्रमाणे एकत्रिकरण क्षेत्राची सिटी सर्व्हे विभागाकडून मोजणी करुन घ्यावी. त्यात काही तफावती आढळल्यास 'क' प्रत प्रमाणे सुधारित एकत्रीकरण नकाशा मंजुरी करिता सादर करणे बंधनकारक राहिल.

3) या कार्यालयाकडुन दिलेले एकत्रिकरण हे अंतिम राहिल व सर्व अर्जदारांना बंधनकारक राहिल.

4) कोणत्याही स्वरूपाचा वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील. आपले हक्क संबंध पाहून एकत्रिकरण करावे.

5) एकत्रीकरण झाल्यावर मंजुर भुखंडावर 1 (एक) महिण्याचे आंत नोंद नगर परिषदेकडून करावी लागेल, त्या शिवाय भुखंडाचा उपयोग घेता येणार नाही. सदर एकत्रिकरण केलेल्या भुखंडावर नगर परिषदेची रितसर परवानगी घेऊन बांधकाम करावे लागेल.

6) वेळोवेळी शासनाकडून ज्या अटी व शर्ती लागू होतील त्या आपणास बंधनकारक राहील.

7) मंजुर नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे रस्ता व त्या लगत भुमीगत नाली तसेच खुली जागेला कंपाउंड वॉल व उद्याण विकसीत करून विनामुल्य नगर परिषदेला हस्तांतरीत करावे लागेल.

8) मंजुर नकाशामध्ये रस्त्यालगत व प्लॉटमध्ये ट्रिगार्ड सह वृक्षारोपन करून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी आपली राहिल.

9) मंजुर केलेल्या एकत्रिकरणानुसार लायसन्स इंजिनीअर/आर्कीटेक्ट यांनी टाकलेला ले-आऊट परिषदेकडून तपासुन घ्यावा लागेल.

10) एकत्रीकरण पुर्वी विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय असलेला एफएसआय हा एकत्रीकरणानंतर निर्माण होणाऱ्या प्लॉट करीता लागु राहील.

11) प्रस्तावित एकत्रिकरणानंतर निर्माण होणाऱ्या भूखंडावर नगर परिषदची परवानगी घेऊनच बांधकाम करावे लागेल.

12) भविष्यात सदरील प्लॉटचे विभाजन करून सदर प्लॉट मधील जागा विक्री/हस्तांतरीत करता येणार नाही.

13) मालक – मे.मॉ.वैष्णवी रियअल इस्टेट तर्फे भागीदार – श्री. प्रदीप देविदास रिठे व इतर.

14) आर्कीटेक्ट – मे.पराते ॲन्ड असोसीएटस नागपूर परवाना क्रमांक 13948/91.

15) नगर भुमापन क्रमांक 6851/1 व 6852(भाग) शिट क्रमांक 78 व 86 जोगीठाणा पेठ उमरेड तह. उमरेड जि.नागपूर.

16) परवानगी क्रमांक .... दिनांक ....

5– परवानगी दिलेले अंतिम भुखंडाचे क्षेत्र (6851/1 + 6852(भाग) = 3344.83 चौ.मी.

वजा 10 टक्के खुली जागा	=	434.48 चौ.मी.
वजा विद्यमान रस्त्या खालील जागा	=	277.84 चौ.मी.
अंतिम भुखंडाचे क्षेत्रफळ	=	2632.51 चौ. मी.

<u>सहपत्र</u> – **एकत्रिकरण नकाशाची प्रत**

21/3/15

मुख्य अधिकारी
नगर परिषद उमरेड

<u>प्रतिलिपी</u> –

1) मा. जिल्हाधिकारी, नागपूर.
2) मा. सहाय्यक संचालक, नगर रचना शाखा कार्यालय नागपूर.
यांना माहितीस्तव सविनय सादर.
3) कर अधिक्षक, नगर परिषद उमरेड.
यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

सही/-

मुख्य अधिकारी
नगर परिषद उमरेड